IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
*Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal*
ISSN 2455-4375

# आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता आणि परिवर्तनमूल्ये

**डॉ. अनमोल शेंडे**
मराठी विभागप्रमुख
गोविंदराव वारजुकर कला, वाणिज्य महाविद्यालय, नागभीड, जि.चंद्रपूर
९४०४१२०४०९
shendeanmol@gmail.com

**सारांश :**

आंबेडकरवादी साहित्यात कविता या वाङ्मय प्रकाराचे विशेष स्थान आहे. कविता या वाङ्मय प्रकारात जसे कवींनी काव्यलेखन केले, तसे कवयित्रींनी देखील काव्यलेखन केलेले आहे. विशेष सांगायचे तर कविता लिहायची म्हणून आंबेडकरवादी कवयित्रींनी कवितालेखन केलेले नसून ती त्यांच्या मूल्यभावाची भाषा आहे. वर्णव्यवस्था आणि पुरुषसंस्कृतीच्या जोखडातून बाहेर पडण्यासाठी कवयित्रींनी केलेली झटापट म्हणजे ही कविता आहे. हा त्यांचा स्वयंस्फूर्त उद्गार आहे. या कवितालेखनात त्यांच्या जगण्याची स्वतंत्र मुद्रा उमटलेली असून जीवनाच्या गुंतागुंतीचे विवक्षित रूप आंबेडकरवादी कवयित्रीने रेखाटलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाला समोर ठेवून आंबेडकरवादी कवयित्रींनी काव्यलेखन केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या कवयित्रींचे प्रेरणास्त्रोत असून उत्स्फूर्त आणि उद्रेकी भावनाविष्कार या आंबेडकरवादी कवयित्रींच्या काव्यातून जिवंतपणे साकार झालेला आहे. मानवी मूल्ये साकार करणे हे या कवयित्रीचे जीवितध्येय आहे. कुठल्याही दुर्बोधतेत किंवा अंतर्विरोधात शिरणारी ही कविता नसून भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा यासाठी आंबेडकरवादी कवयित्रींनी आपली लेखणी झिजवली आहे. परंपरेच्या साचलेपणाविरुद्ध या कवितेने जळजळते नकार अभिव्यक्त केले आहेत. रूढी आणि अमानुषतेच्या विरोधात जाहीर एल्गार आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेत पहायला मिळतो. या कवयित्रींची कविता म्हणजे मानवमुक्तीचे आंदोलन आहे. कवितेच्या माध्यमातून परिवर्तनवादी जाणिवांचा उत्स्फुर्त आविष्कार अतिशय देखण्या स्वरूपात या कवयित्रींनी मांडलेला असून माणुसकीशी द्रोह करणाऱ्या साऱ्या संचितांना कवयित्रींनी धारेवर धरले आहे. ज्या अभिजनांनी बहुजनांचे शोषण केले, त्या शोषणाविरुद्ध आंबेडकरवादी कवयित्रींनी बंड उभारलेले आहे. या कवितेला येथील माणसाचे दु:ख दिसले, दैन्य दिसले आणि माणूसपण साकारण्यासाठी आंबेडकरवादी कवयित्रींनी सारी ताकद एकवटून व्यवस्थेवर जळजळीत भाष्य केले.

**प्रस्तावना :**

या देशातील चातुर्वर्ण्यव्यवस्थेने विषमता अभंग केली. या विषमतेचे जहर हजारो वर्षांपासून भारतीय मानसिकतेत पाहायला मिळते. माणूस म्हणून जगण्याचा हक्क या चातुर्वर्ण्यव्यवस्थेने नाकारला. स्त्री आणि पुरुषात भेदाची अखंड भिंत उभी केली. शोषण हा या चातुर्वर्ण्यव्यवस्थेचा मुख्य गाभा असून गुलामीच्या मानसशास्त्राला या व्यवस्थेने बळकटी प्रदान केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या चातुर्वर्ण्यव्यवस्थेचे खरे रूप येथील बहुजन समाजाला समजावून सांगितले. त्यांना अस्तित्वाची जाणीव करून दिली. त्यामुळे बहुजन प्रतिभा बंड करून उठल्या. विशेष

रूपाने १९६० नंतर साहित्यातून हे सर्व आविष्कार आपल्याला पाहायला मिळतात. आंबेडकरवादी कविंबरोबर कवयित्रींनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून आपल्या जाणिवांचे मजबूत विश्व उभे केले. समतेच्या रणांगणात लढण्यास त्या सिद्ध झाल्या. विशेषत: आशय आणि अभिव्यक्तीचे सुंदर प्रारूप या कवयित्रींच्या काव्यातून फुललेले पहायला मिळते. निराशा, अध्यात्म आणि नियती या गोष्टींना आंबेडकरवादी कवयित्रींनी स्पष्ट शब्दात नकार नोंदवला असून परिवर्तनवादी जीवनमूल्ये साकार करण्यासाठी ही कविता अत्युत्कट पातळीवरून साकार झालेली दिसून येते.

**आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतील परिवर्तनमूल्ये :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशात विषमतारहित संस्कृती जन्मास घालण्यासाठी प्रचंड कष्ट उपसले. एका बाजूला या देशातील वर्णव्यवस्थेने बहुजनांना छळले तर दुसऱ्या बाजूने समतेचे मारेकरी असणाऱ्या आणि वर्णव्यवस्था बळकट करणाऱ्या ग्रंथांनी बहुजनांचे शोषण केले. भौतिकवादी जीवनदृष्टीला स्पष्ट नकार दिला. देव—दैववाद, स्वर्ग—नरक या काल्पनिक गोष्टीत गुंतवून ठेवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे सर्वच अमानवीय तत्त्वज्ञान समजून घेतले. विशेषत: जोपर्यंत या विषमतेविरोधात आपण बंड करून उठत नाही, तोपर्यंत आपण आपले हक्क अधिकार प्राप्त करू शकत नाही याची जाणीव बाबासाहेबांना प्रकर्षाने झाली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रस्त्यावरची लढाई लढत असतांना व्यवस्थेविरोधातही ग्रंथलेखन केले. ही दोन्ही आयुधे वापरून त्यांनी बहुजनांना जागृत केले. त्यासाठी बहुजनांना त्यांचे हक्क मिळवून देत असतांना कुठल्याही प्रकारची कसर बाकी ठेवली नाही. धर्मनिरपेक्षता स्थापन व्हावी आणि दलित बहुजनांना त्यांचे हक्क—अधिकार मिळावेत यासाठी बाबासाहेबांचा हा संगर होता.

या देशातील स्त्रियांवर सामाजिक, आर्थिक, लैंगिक, सांस्कृतिक, धार्मिक अशा सर्वच पातळ्यांवर सतत शोषण झालेले आहे. या शोषणाविरुद्ध सर्वप्रथम सावित्रीबाईंनी स्त्रीमुक्तीसाठी मूलभूत पातळीवरून कार्य केले. त्यांच्या 'काव्यफुले' आणि 'सुबोध रत्नाकर' या काव्यसंग्रहात विषमतेविरुद्धच्या विद्रोही छटा आपल्याला पहायला मिळतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाला समोर ठेवून १९६० नंतर आंबेडकरवादी कवयित्री अतिशय सुंदर पद्धतीने अभिव्यक्त झालेल्या आहेत. धर्मग्रंथांच्या पानावरील काळाकुट्ट अंधार पुसून टाकण्यासाठी त्या सरसावल्या आहेत. या कवितांमधील स्त्रीमुक्तीचा आक्रोश समतेच्या तत्त्वांना उजागर करणारा आहे. या कवितेला कुठल्याही प्रकारचे बेगडी तत्त्वज्ञान मान्य नाही. 'क्रांतीकुलाची दायाद' म्हणून स्त्रीवादाचा आशय कवितांमधून सुंदर पद्धतीने साकार झालेला दिसून येतो. 'उजेडाचा हव्यास' या कवितेला लागलेला असून सुंदर जीवनाची स्वप्ने पाहणे यासाठी ही कविता आसुसलेली आहे. ''मुलगी, बहिण, बायको आणि यांसारख्या अनेक नात्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडणारे स्त्रीमन, आधुनिकतेमुळे बदलत जाणारी आर्थिक समीकरणे, त्यातील स्त्रीचे स्थान, फुले—आंबेडकरी विचारांच्या आधारे संस्कृतीने लादलेले जगणे नाकारणे अशा अनेकविध पेचांना दलित स्त्रिया कवितेतून व्यक्त करतात. त्यामुळेच हा केवळ वाङ्मयीन आविष्कार न राहता सामाजिक जीवनाचे सखोल प्रतीबिंब या कवितेत उमटले आहे.''[१] आंबेडकरवादी कवयित्री भूतकाळाचा वेध घेत असताना वर्तमानातील ज्वलंत प्रश्नांनाही ऐरणीवर आणतात. बदलत जाणारे समाजजीवन कवितेतून मांडतात.

आधुनिक काळात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना आजूबाजूचे बदल स्वच्छ रुपात दिसू लागले. प्रगतीसाठी आखावयाची धोरणे तिला खुणावू लागली. सतत शोषण करणारे मानसशास्त्र तिच्या नजरेसमोर

दिसू लागल्यामुळे स्वत:चे अस्तित्व साकार करण्यासाठी ही आंबेडकरवादी स्त्री त्यामुळेच कवितेतून जळफळाट व्यक्त करताना दिसते. सुगंधा शेंडे यांचे 'विरतं धुकं', 'आम्रपाली भावपल्लवी' आणि 'अग्निशिखा' हे तीन काव्यसंग्रह आहेत. या तिन्ही काव्यसंग्रहातून कवयित्रीने व्यवस्थेला प्रश्न विचारले आहेत. जोतीबांनी लावलेली ज्ञानाची ज्योत तेवत ठेवण्याची प्रतिज्ञा करत असताना निर्माण झालेल्या भेदभावाला या कवयित्रीने मुठमाती देण्याचा निर्धार कवितांमधून केलेला दिसून येतो. 'पौर्णिमा' आणि 'फिर्याद' हे काव्यसंग्रह आहेत हिरा बन्सोडे यांचे! या कवयित्रीच्या कवितेला आंबेडकरवादी कवितेत विशेष असे स्थान आहे. 'क्रांतीची बिजली पेटती आहे प्रत्येक घायाळ हृदयात, ही लढाई अटळ आहे... अटळ आहे.' अशी युद्धाची भाषा ही कविता करते. मानवतेचे राज्य स्थापन करण्यासाठी युद्ध अपरिहार्य आहे, असे कवयित्रीचे निक्षून सांगणे आहे.

ज्योती लांजेवार, सुरेखा भगत, प्रज्ञा लोखंडे, सरला ठमके, उषाकिरण आत्राम, कुसुम आलाम, उल्हासिनी कांबळे या आंबेडकरवादी कवयित्रींनी साकार केलेला काव्याविष्कार मोठाच देखणा आहे. आपण विद्रोही कवयित्री असून परिवर्तनवादी जीवनमूल्ये जन्माला घालण्याची भीम प्रतिज्ञा पूर्ण केली पाहिजे, या अविर्भावात ही कविता फुलतांना दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले यांच्या क्रांतीविचारांच्या वाटेने चालण्याचे धाडस या कवयित्रींमध्ये आहे. त्यामुळे कुणाला भिण्याचा प्रश्नच कवयित्रींच्या मनात येत नाही. ''म्होरकी ही गोटूलातील हुशार, जिद्दी, निर्भीड स्त्री नेतृत्व करणारी नायिका 'मोट्यारीन' या गोंडी नावाने ओळखल्या जाते. तिचेच मराठी नाव 'म्होरकी' ठेवून रानावनातल्या सखीसयांना एकत्र आणून समाजजागृती, स्त्री जागृती करण्यासाठी शोषण, अन्याय, अत्याचार, पिळवणूक, छळ या साऱ्यांचा प्रतिकार करण्यासाठी, शोषणाविरुद्ध अत्याचार–अन्यायाविरुद्ध बंड पुकारून क्रांती करण्यासाठी दलित, कष्टकरी, आदिम, श्रमिक, शोषित पीडित महिलांचे दु:ख वेशीवर टांगण्यासाठी इथल्या समाजव्यवस्थेवर प्रहार करणारी, इथल्या स्त्री जातीवर अन्याय करणाऱ्या सामाजिक रूढी बंधनावर घणाघाती घाव घालणारी माझी 'म्होरकी' जराही भीत नाही.''[२] उषाकिरण आत्राम यांनी आपल्या 'म्होरकी' या कवितासंग्रहात केलेले हे निवेदन पाहिले म्हणजे या कवितेचा नेमका प्रवास अधोरेखित होतो. ही कविता आंबेडकरवादी साहित्यचळवळीतून साकार झाली असल्यामुळे मनू संस्कृतीचे जोखड फेकण्याचा कवयित्रींचा निर्धार मोठा विलोभनीय आहे. निर्भय समाज निर्माण करण्याचे स्वप्न बाळगणारी आंबेडकरवादी कवयित्रींची कविता युगंधर जाणिवांशी आणि आमूलाग्र परिवर्तनाशी घट्टपणे जोडली गेलेली आहे.

लढाई कुणाशी करायची याचे स्पष्ट भान आंबेडकरवादी कवयित्रींना आहे. शतकानुशतके ज्यांच्या अमानुष परंपरेने बहुजनांना छळले, त्या अमानुष परंपरांचे बुरखेच या आंबेडकरवादी कवयित्रींनी टराटरा फाडले आहेत. भोवतीच्या समाजाचा आपल्यावर होत असलेला निर्घृण अत्याचार पहात असताना या कवयित्रींनी अश्रूतून ठिणग्या फुलवल्या आहेत. दु:खाच्या आसवांतूनही नवे जग जन्माला येईल ही आशा या कवितांना लागून राहिलेली आहे. कुठल्याही प्रकारची विषमता ही राष्ट्राला नामोहरण करते हा विश्वास आंबेडकरवादी कवितेला आहे. प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेबद्दल डॉ. यशवंत मनोहर यांनी जे मत मांडले आहे ते पाहू जाता या कवितेचा पोत स्पष्टपणे लक्षात येतो. यशवंत मनोहर म्हणतात, ''प्रकाशयात्री फुले–आंबेडकरी स्त्रीवादानेच कवयित्रीच्या मनात एका मनोरम ध्यासाचा विद्युतवृक्ष लावला आहे.स्त्री असो वा पुरूष असो कोणालाही कोणीही दुय्यम लेखणार नाही आणि समतेचे सन्मानजीवन लाभेल असा आदर्श समाज हीच कवयित्रीला हवी असणारी पहाट होय.''[३] या सुंदर पहाटेचे स्वप्न पाहण्यासाठीच आंबेडकरवादी

कविता तडफडताना दिसते. समतेचे गीत गुणगुणतांना एका नव्या जगाची अभिव्यक्ती करताना ही कविता दिसून येते.

आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेत कुठेही आक्रसताळेपणा नाही. स्त्री ही परप्रकाशित आहे हे तत्वज्ञान तिला मंजूर नाही. स्त्रियांचे अस्तित्व उखडून टाकणाऱ्या इथल्या तथाकथित संस्कृतीला म्हणूनच ती नकार देते. हा नकार केवळ वरवरचा नसून त्यामागे दडलेले ऐतिहासिक सत्यही कवयित्री अधोरेखित करते. रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, देव—दैववाद नेस्तनाबूत व्हावेत आणि स्वच्छ चेहरा असलेला मानवी समाज निर्माण व्हावा अशी कवयित्रींची धारणा आहे. ही कविता व्यक्तीगतरित्या प्रकट न होता त्यात सामुहिक नेणिवा आहेत. निराशाग्रस्त जीवन टाकून देण्याचे धाडस ही कविता करते. संविधान संस्कृती जन्माला यावी यासाठी या कवितेने माणुसकीचे तत्त्वज्ञान मानवी जगापुढे मोठ्या नेकीने अंथरले आहे. कुमुद पावडे, ज्योत्सना चांदगुडे, संध्या रंगारी, मीना गजभिये, माया वासनिक, उमा भालेराव, सरिता जांभुळे, धम्मज्योती कांबळे, आशा थोरात, उमा साळवे अशा अनेक कवयित्रींनी परिवर्तनवादी जीवनसूत्रे आपल्या कवितेतून अत्यंत ध्येयधुंदपणे साकार केलेली आहेत.

स्त्रियांना अंध:कारात ढकलणारी ही व्यवस्था आहे. पुरुषी वर्चस्व स्त्रियांना रक्तबंबाळ करते. तिच्यावरील पुरुषांचे नानाविध बंधने अजूनही सैल झालेली दिसून येत नाही. अशावेळेला ही कविता तकलादू वृत्तीवर ताकदीने प्रहार करते. नाना पातळ्यांवरील वेदना पार करीत असताना आपले स्वतंत्र अस्तित्व सिध्द करण्यासाठी ही कविता आकांत मांडते. वैदिक परंपरेच्या दांभिकतेला नाकारीत पुरुषसुक्ताची तिने पोल—खोल केलेली आहे. विज्ञाननिष्ठा हा या कवितेचा खंबीर बाणा असून विषमतेचे बांधकाम मजबूत करणाऱ्या इतिहासाचे पुनर्लेखन करण्यासाठी ही कविता सज्ज झालेली आहे. ''नवरा नावाची व्यवस्था बायकोकडून वेगवेगळ्या प्रहाराप्रमाणे अपेक्षा ठेवत असते. संसार नावाच्या व्यवस्थेने तिला स्वप्न पाहण्याची मुभा ठेवली नाही. असे व्यवस्थेच्या विविध स्तरावर, विविध पातळ्यांवरील स्त्री शोषणाचे स्तर स्पष्ट केले आहेत. स्त्रीला फक्त शरीर असते. भावना, संवेदना नसतातच असे गृहीत धरून व्यवहार सुरू ठेवणाऱ्या व्यवस्थेचे रूप, प्रारूप उघड केले आहे. हप्त्याहप्त्याने झिजत झिजत संपत जाणाऱ्या आयुष्याची अस्वस्थ करणारी कहाणी या कवितेने सांगितली आहे.''[४] व्यवस्थेला कुठल्याही परिस्थितीत शरण न जाता पुरुषी सत्तेशी दोन हात करण्याची भाषा ही कविता करते. अर्थात सुड घेणे हा या कवितेचा स्वभाव नसून समतेचे विश्व साकार करणे हा या कवितेचा उद्देश आहे.

आंबेडकरवादी कवयित्रींची कविता ही 'भूमिका' घेणारी कविता असून कुठल्याही अंतर्विरोधाच्या छटा तिच्या कवितेत आढळतांना दिसत नाही. अतिशय प्रामाणिक हेतूने ही कविता अभिव्यक्त झालेली आहे. भारतीय संविधानातील जग साकारण्यास ही कविता तडफडतांना दिसते. 'बांधीलकी' हा या कवितेचा प्राण आहे. परिवर्तनवादी चळवळीवि यी या कवितेने चिंता वाहिलेली असून सुंदर भविष्यकाळाचे स्वप्न ही कविता पाहते. रोखठोकपणा हा या कवितेचा सहज स्वभाव आहे. ही कविता कुठेही हरवून जाणारी नाही. कारण या कवितेची उद्दिष्टे आणि प्रयोजने ठरलेली आहेत. इ. स. २००० नंतरही अनेक आंबेडकरवादी कवयित्री अतिशय जोमाने कविता लेखन करताना दिसून येतात. 'जळतं वर्तमान' या कवयित्रिंनी आपल्या कवितेतून अधोरेखित केला आहे. मानवतेचे सोहळे साजरे करण्यासाठी आणि नव्या बंधमुक्त युगाचे स्वप्न पहाण्यासाठी ही कविता संपूर्ण ताकदीनिशी सज्ज झालेली आहे.

**निष्कर्ष :**

प्रस्तुत संशोधनपर लेखामध्ये आंबेडकरवादी कवयित्रींनी केलेला काव्याविष्कार अधोरेखित केलेला आहे. आंबेडकरवादी कवयित्रींच्या काव्याची वैशिष्ट्ये मांडत असताना या कवितेच्या वेगळेपणाची नेमक्या शब्दात चर्चा केलेली आहे. परिवर्तन हा या कवितेचा अंतर्भूत गुण आहे. देशातील ज्वलंत वास्तव मांडत असताना या कवितेने घेतलेल्या स्पष्ट भूमिकेचे अवगानही या संशोधनपर लेखात केले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. जया विश्वनाथ पाटील, दलित कवयित्रींची कविता : स्वरूप आणि चिकित्सा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१४, पृ. ४४–४५
२. उषाकिरण आत्राम, प्रस्तावना, म्होरकी, गोंडवाना गोंडी साहित्य परिषद, नागपूर, १९९७
३. यशवंत मनोहर, आंबेडकरवादी मराठी साहित्य, भिमरत्न प्रकाशन, नागपूर, १९९९, पृ. १९५
४. महेंद्र भवरे, मराठी दलित कवितेचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०१८, पृ. ४१५